Impact Factor – 6.625 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S


# RESEARCH JOURNEY

**Multidisciplinary International E-Research Journal**

**Peer Reviewed & Indexed Journal**

October-2019 Special Issue – 198

# गांधी विचारधारा एवं ग्रामस्वराज की संकल्पना



अतिथि संपादक :
डॉ. अजयकुमार मोहबंसी
प्राचार्य,
कला व वाणिज्य पदवी महाविद्यालय,
पेट्रोलपंप जवाहरनगर,
त. जि. भंडारा

विशेषांक संपादक
डॉ. राजेंद्रप्रसाद पटले
कला व वाणिज्य पदवी महाविद्यालय, पेट्रोलपंप
जवाहरनगर,
त. जि. भंडारा

विशेषांक सहसंपादक
डॉ. आर. आर. चौधरी
डॉ. हरगोविंद टेंभरे

मुख्य संपादक
डॉ. धनराज धनगर

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani Distt. Bhandara

Late N. P. W. College, Lakhani, Distt. Bhandara
Ref No.
Dt.

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 198 : गांधी विचारधारा एवं ग्रामस्वराज की संकल्पना
ISSN : 2348-7143
October-2019

# महात्मा गांधी व असहकार चळवळ

प्रा. डॉ. प्रमिला डी. भोयर,
(सहा. प्राध्यापक) इतिहास विभाग प्रमुख
स्व.निर्धन पाटील वाघाये
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,लाखनी,
जि.भंडारा–441804
E-mail – bhandarkarpriyansh@gmail.com
Mobil No. – 9765889913

1 ऑगष्ट 1920 ला लो. टिळकांचा मृत्यु झाला व खऱ्या अर्थाने म.गांधी 1920 पासून भारतीय राजकारणात उतरले. देशाला इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त करणारे किंवा स्वातंत्र्य मिळवून देणारे तीन विचारप्रवाह होते मवाळवादी, जहालवादी आणि क्रांतीकारी लो.टिळक हे जहालवादाचे पुरस्कर्ते होते तर म.गांधी हे मवाळवादाचे पुरस्कर्ते होते. परंतू दोघांचाही उद्देश एकच होता आणि तो म्हणजे देशाला स्वातंत्र्य मिळवुन देणे. भारतीय राजकारणाची पार्श्वभूमी लो. टिळकांनी तयार करून ठेवली होती. तेच राजकारण पुढे चालविण्याचे कार्य म.गांधीनी केले.

आधुनिक भारताच्या इतिहासात इ.स. 1920 हे वर्षे अतिशय महत्वाचे समजल्या जाते. हयाच वर्षी भारतीय स्वातंत्र्य संग्रामाला एक वेगळेच वळण लागले आणि भारताच्या कार्यपध्दतीला एक नविन दिशा मिळाली व ही नवि दिशा देण्याचे कार्य म.गांधीनी केलेत.

**असहकार चळवळ 1920 ते 1922 :–**

लो. टिळकांच्या मृत्युनंतर भारतीय राष्ट्रीय आंदोलणाचे नेतृत्व 1920 मध्ये म.गांधीकडे आले. सुरूवातीला म.गांधीचा ब्रिटीशांच्या न्यायबुध्दीवर विश्वास होता. त्यामुळे त्यांना ब्रिटीश साम्राज्याचा नागरीक म्हणुन घेण्यात अभिमान वाटत असे म्हणुन पहिल्या महायुध्दात ब्रिटीशांना सर्व भारतीयांनी सहकार्य करावे अशा प्रकारचे आव्हान म.गांधीनी केले. परंतु गांधीच्या मवाळ धोरणांनी किंवा अर्ज विनंत्यांनी ब्रिटीश सहकार माणनार नव्हते किंवा भारताला स्वातंत्र्य किंवा सुधारणा देणार नव्हते.

नंतर गांधीजीच्या विचारात परीवर्तन होण्यास सुरूवात झाली त्यामुळे गांधीनी सप्टेंबर 1920 मध्ये कलकत्ता येथे भरलेल्या कॉग्रेसच्या अधिवेशनात ब्रिटीश सरकारसी असहकाराचा ठराव मंजूर करूण घेतला आणि चळवळ उभारण्याचे सुध्दा ठरविण्यात आले.

**असहकार चळवळीची कारणे / कारणीभुत परस्थिती :–**

**1) पहिल्या महायुध्द काळातील पोकळ घोषणा :–**

इ.स. 1914 मध्ये पहिल्या जागतीक महा. सुरूवात झाली. त्यावेळी दोस्त राष्ट्रांनी त्यामध्ये ब्रिटनही होते. पहिल्या महा. जर आम्हाला विजय मिळाला तर, साम्राज्यवादाखाली भरडल्या जाणाऱ्या सर्व जनतेला स्वातंत्र्य व सरंक्षण दिले जाईल. अशा प्रकारची घोषणा दोस्त राष्ट्रांनी केली होती. त्यामुळेच भारतातील जनतेनी स्वातंत्र्याच्या आशेनी पहिल्या महा. ब्रिटीशांना सहकार्य केले. परंतु युध्द समाप्तीनंतर ब्रिटीशांनी संरक्षण, स्वातंत्र्यतर दुरच राहिले. साध्या भारतीयांच्या मागण्याकडे सुध्दा ब्रिटीश सरकारने अजिबात लक्ष दिले नाही. त्यामुळे भारतीय जनतेच्या मनात ब्रिटीशांविषयी असंतोष निर्माण झाला. आणि त्यामुळे असकार चळवळ सुरू झाली.

Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani Distt. Bhandara

Late N. P. W. College, Lakhani, Dist. Bhandara
Ref No.
Dt.

**2) आर्थिक व नैसर्गिक संकट :–**

पहिल्या महायुध्दा ब्रिटनने भाग घेतल्यामुळे युध्द खर्चासाठी ब्रिटीशांनी विविध मार्गाचा अवलंब करून भारतीय जनतेकडून फार मोठया प्रमाणात पैसा वसुल केला. त्यामुळे भारतीयांची आर्थिक स्थिती खालावली याशिवाय युध्दामुळे वस्तुच्या किंमती मोठया प्रमाणात वाढल्या. तरी सुध्दा ब्रिटीश अधिकारी पैश्यासाठी भारतीय जनतेवर अत्याचार करीत होते. अश्या प्रकारे भारतीय जनता ब्रिटीशांच्या अत्याचाराला कंटाळली होती. युध्द काळात दुष्काळ व रोगराई अश्या नैसर्गिक आपत्तींनी भारतीयांना त्रस्त केले होते. परंतु शासनकर्ता म्हणुन ब्रिटीश सरकारनी यावर कोणतीही उपायायोजना केली नव्हती. त्यामुळे भारतीय जनतेमध्ये ब्रिटीशांविषयी प्रचंड असंतोष निर्माण होवुन त्याची परिणीती असहकार आंदोलनात झाली.

**3) सरकारची दडपशाही :–**

ब्रिटीशांच्या काही धोरणामुळे भारतात इंग्रजांविषयी असंतोष वाढत चालला होता म्हणुन भारतीयांचा असंतोष कमी करण्याच्या दृष्टीने ब्रिटीश सरकारनी प्रेस ॲक्ट सारखे अनेक कठोर कायदे पास केले आणि त्या कायदयाच्या माध्यमातुन ब्रिटीश सरकारनी दडपशाही धोरण सुरू केले हयाच कालावधीत ब्रिटीश सरकारने काही भारतीय क्रांतीकारकांना फाशी दिली. 'होमरूल चळवळ' सुध्दा ब्रिटीश सरकारनी दडपुन टाकली. अश्या या ब्रिटीशांच्या दडपशाही धोरणामुळे भारतीय जनतेत असंतोष निर्माण होवुन असहकार आंदोलन सुरू झाले.

**4) मॉटेग्यु चेम्सफर्ड सुधारणा कायदा (1919) :–**

पहिल्या महायुध्दानंतर ब्रिटीश सरकारनी भारतात काही सुधारणा करण्याच्या दृष्टीने इ.स. 1919 मध्ये 'मॉटेंग्यु चेम्सफर्ड कायदा' पास केला परंतु हया कायदयामध्ये भारताला स्वातंत्र्य मिळेल अश्या प्रकारच्या एकाही उत्तरदायी योजनेचा समावेश नव्हता. केंद्रीय आणि प्रांतीय विधीमंडळामध्ये इंग्रजांचा जास्त प्रमाणात समावेश असुन भारतीयांना दिले गेलेले प्रतिनिधीत्व अतिशय कमी होते. प्रांतीय शासन व्यवस्थेत या कायदयाद्वारे निर्माण केलेली शासन पध्दती हे एक केवळ नाटक होते त्यामुळे भारतीयांचे हया कायदयांनी समाधान होवु शकले नाही. हया कायदयांनी आपली फसवणुक केली असे भारतीयांना वाटु लागले, त्यातुनच असहकार आंदोलन सुरू झाले.

**5) रौलेट कायदे (मार्च 1919) :–**

ब्रिटीश सरकारच्या स्वार्थी अन्याय धोरणामुळे भारतीयांमध्ये इंग्रजांच्या विरोधात दिवसेंदिवस असंतोष वाढत चालला होता. भारतीय क्रांतीकारकांनी इंग्रज सरकारला त्रस्त केले होते. क्रांतीकारी चळवळींना दडपुन टाकण्यासाठी आणि भारतीयांचा असंतोष कमी करण्यासाठी सन 1919 मध्ये ब्रिटीश सरकारनी 'रौलेट नावाचा कायदा' पास केला. त्यानूसार कोणत्याही भारतीय व्यक्तीला कारणांशिवाय अटक करणे आणि खटला न भरता तुरूंगात डाबणे हा अधिकार हया कायदयाद्वारे ब्रिटीश सरकारला मिळाला. त्यामुळे ब्रिटीशांनी विनाचौकशी भारतीयांना अटक करण्यास सुरूवात केली. त्यातुनच भारतीय जनतेचा असंतोष वाढुन असहकार आंदोलन सुरू झाले.

**6) जालियनवाला बाग हत्याकांड (एप्रिल 1919) :–**

ब्रिटीशांनी रौलेट कायद्याच्या अंतर्गत पंजाब प्रांतात सुध्दा अटक सत्र सुरू केले आणि दडपशाही धोरणाला सुरूवात केल्यामुळे, हया कायद्याचा निषेध म्हणुन पंजाबमधील जनतेनी अमृतसर येथे एप्रिल 1919 रोजी जालियनवाल्या बागेत एक सभा भरविली ही सभा अतिशय शांततेने सुरु असतांना अचानक या सभेवर इंग्रज अधिकारी जनरल डायरने गोळीबार करण्यास सुरूवात केली.



Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara
Late N.P.W. College, Lakhani Ref No. Distt. Bhandara

त्यामुळे अनेक लोक मृत्युमुखी पडले. यालाचा 'जालियनवाला बाग हत्याकांड' म्हणतात. हया घटनेमुळे भारतीय जनतेच्या मनात इंग्रजांविषयी द्वेशाची भावना निर्माण होवुन असहकार आंदोलन सुरू झाले.

**7) हंटर कमिशनचा अहवाल :–**

जालियनवाला बाग हत्याकांडामुळे भारतीय जनतेच्या मनात इंग्रजांविषयी मोठया प्रमाणात असंतोष निर्माण झाला होता. हा असंतोष कमी करण्यासाठी ब्रिटीश सरकारने हंटर हया इंग्रज अधिकाऱ्या नेतृत्वाखाली जालियनवाला बाग हत्याकांडाची चौकशी करण्याकरीता एक कमिशन पाठविले. यालाच 'हंटर कमिशन' असे म्हणतात. जालियनवाला बाग हत्याकांडाला इंग्रज दोषी असुन सूध्दा हया कमिशनने इंग्रजांचीच बाजु घेतली. आणि जनरल डायरला सेवामुक्त केले. जालियनवाला बाग हत्याकांडाचा निर्णय हया कमीशनने योग्य न दिल्यामुळे भारतीय जनतेच्या मनात हया कमिशनविषयी प्रचंड असंतोष निर्माण होवून असहकार आंदोलनाला सुरूवात झाली.

**8) खिलाफत चळवळ :–**

तुर्कस्तानचा खलिफा जगातील सर्व मुसलमानांचा प्रमुख समझला जात असे. ज्यावेळी पहिल्या महायुध्दाला सुरूवात झाली त्यावेळी तुर्कस्तानने इंग्लंडच्या विरोधात जर्मन गटाला मदत केली. त्यामुळे भारतातील मुसलमान तुर्कस्तानशी लढण्यास तयार होत नव्हते. ब्रिटीश सरकारनी युध्द समाप्तीनंतर तुर्की साम्राज्याचे विभाजन केले जाणार नाही असे आश्वासन भारतीय मुसलमानांना दिले.

परंतु युध्द समाप्तीनंतर दोस्त राष्ट्रांनी तुर्कस्तानवर सेव्हर्सचा तह लादुन (1920) तुर्की साम्राज्याचे लचके तोडले. त्यामुळे ब्रिटीश सरकारने आपल्या आश्वासनाची पुर्ती केलेली नाही. तसेच खलिफाची सत्ता पुर्ववत कायम राखण्यासाठी भारतीय मुसलमानांनी इंग्रजांच्या विरोधात जी चळवळ उभारली तीलाच 'खिलाफत आंदोलन' असे म्हणतात. याला गांधीजींनी सुध्दा साथ दिली.

**असहकार चळवळीचा कार्यक्रम :–**

कलकत्ता अधिवेशनानंतर प्रत्यक्षपणे ब्रिटीशांच्या विरोधी असहकार चळवळ सुरू करण्यासाठी तसेच असहकार चळवळीचा कार्यक्रम निश्चित करण्यासाठी डिसेंबर 1920 मध्ये नागपूर येथे कॉग्रेसचे अधिवेशन भरविण्यात आले. या अधिवेशनात असहकार चळवळीचा ठराव पास करून चळवळीचा कार्यक्रम निश्चित करण्यात आला. स्वराज्य हे कॉग्रेसचे ध्येय ठरविण्यात आले. अहसकार चळवळीचा कार्यक्रम खालीलप्रमाणे ठरविण्यात आला.

1) सर्व भारतीयांनी सरकारी पदव्या आणि सरकारी जागांचा त्याग करावा.
2) सरकारी समारंभावर बहिष्कार घालावा.
3) सरकारी शाळा महाविद्यालयावर बहिष्कार घालुन राष्ट्रीय शाळा, महाविद्यालये स्थापन करावे आणि तिथे आपल्या मुलांना शिक्षणासाठी पाठवावे.
4) सरकारी न्यायालयावर भारतीयांनी बहिष्कार घालावा आणि पंचायत नेमुण भारतीयांनी स्वतःचे तंटे सोडवावे.
5) इंग्रजांच्या भारताबाहेरील कोणत्याही वसाहतीमध्ये भारतीयांनी नौकरीला जावु नये.
6) कायदे मंडळाच्या निवडणुकांवर बहिष्कार घालावा आणि मतदान सुध्दा करू नये.
7) परकीय मालावर बहिष्कार घालावा आणि स्वदेशी मालाचा वापर करावा.

**असहकार आंदोलनाची वाटचाल :–**

Off. Principal
N.P.W. College
Dist. Bhandara

N. P. W. College, Lakhani Dist. Bhandara
Ref No.
Dt.

डॉ.ताराचंद म्हणतात, "सरकारशी असहकाराची घोषणा हे एक मात्र क्रांतीकारी पाऊल असुन ते एक प्रकारे युध्दाच्या घोषणेसारखे होते फरक इतकाच की, हे युध्दा अहिंसक होते.

असहकार चळवळीचा कार्यक्रम निश्चित झाल्यानंतर म.गांधीच्या नेतृत्वात 1921 मध्ये हया चळवळीला सुरूवात झाली. हया चळवळीत बहुसंख्य भारतीय जनतेनी भाग घेतला. हे आधुनिक भारताच्या इतिहासातील पहिलेच जनआंदोलन समजल्या जाते. हे आंदोलन अहिंसेचे मार्गावर आधारित राहील असे म.गांधीनी जाहिर केले होते. हया आंदोलनाची वाटचाल खालीलप्रमाणे सांगता येईल.

**1) एका वर्षात स्वराज्य :–**

राष्ट्रीय कॉंग्रेसने ठरवुन दिलेल्या असहकाराचा कार्यक्रम भारतातील सर्व जनतेनी प्रामाणीकपणे अंमलात आणला तर, एका वर्षात देशाला स्वराज्य मिळवुन देवु, अश्या प्रकारची घोषणा म.गांधीजीनी केली परंतू त्यासाठी शिस्त, स्वार्थत्याग, संघटन शक्ती आणि अहिंसा हया तत्वांचे पालन करणे अतिशय आवश्यक आहे असे गांधीजींचे मत होते.

**2) असहकार चळवळीचे विधायक स्वरूप :–**

म.गांधीजींच्या नेतृत्वात सुरू झालेल्या असहकार चळवळीचे विधायक आणि नकारात्मक अशी दोन रूपे होते. असहकार चळवळीच्या कार्यामध्ये स्वदेशी उद्योगांना चालना देणे त्यासाठी नव–नविन उद्योगधंदयाचा विकास करणे, खादिचा प्रचार करणे, दारूबंदी प्रचार करणे, अस्पृश्यता नष्ट करणे, हिंदु–मुस्लीम एकतेवर भर देणे, हातमाग खादीसाठी चरख्यांचा वापर करणे इत्यादी विधायक कार्यांचा समावेश असहकार चळवळीमध्ये केला गेला. हयाच काळामध्ये चळवळ चालविण्यासाठी पैसा लागत होता म्हणुन टिळकांच्या नावावर स्वदेशी फंड म्हणुन पंधरा लाख रूपये जमविण्यात आले. हया विधायक कार्यामुळे भारतीय जनतेमध्ये फार मोठया प्रमाणात जागृती घडुन आली.

**3) असहकार चळवळीचे नकारात्मक स्वरूप :–**

नकारात्मक कार्यामध्ये परदेशी मालावर बहिष्कार घालणे त्यामुळे विदेशी मालाच्या ठिकठिकाणी होळया होवु लागल्या. सरकारी शाळा, महाविद्यालये, कोर्ट–कचेऱ्या यांच्यावर बहिष्कार घालण्यात आला, सरकारी पदव्याव व जागांचा त्याग करण्यात आला. म.गांधीनी सर्वप्रथम ब्रिटीशांकडून मिळालेल्या कैसर–ए–हिंद या पदवीचा त्याग केला. बॅरिस्टर चित्तरंजन दास, लाला लजपतरॉय, पंडीत नेहरू, सुभाषचंद्र भोस, डॉ.राजेंद्र प्रसाद इत्यादी नेत्यांनी आप–आपल्या पदव्यांचा त्याग केला. हयाचवेळी बंगाल, बिहार आणि काशी हया ठिकाणी देशी विद्यापीठांची स्थापना करण्यात आली.

**4) प्रीन्स ऑफ वेल्सवर बहिष्कार आणि सरकारची दडपशाही :–**

असहकार चळवळीमुळे भारतात ब्रिटीशांविषयी प्रचंड राजकिय असंतोष निर्माण झाला होता. भारतीयांमध्ये निर्माण झालेला असंतोष कमी करण्याच्या दृष्टीने नोव्हेंबर 1921 मध्ये इंग्लंडचा राजपुत्र प्रींसचे भारतात आगमन झाले. त्यावेळी गांधीजीनी सर्व भारतीयांनी प्रींसच्या समारंभावर बहिष्कार घालावा अश्या प्रकारची घोषना केली. त्यामुळे ज्या–ज्या ठिकाणी प्रींस गेला त्या–त्या ठिकाणी भारतीयांनी त्याचा समारंभावर बहिष्कार घातला. त्यामुळे ब्रिटीश सरकारला चीड आली म्हणुन ब्रिटीश सरकारनी दडपशाही धोरणाचा अवलंब करून आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केला. सभा, मोर्च्यांवर लाठी हल्ले केले, बंदी आणली. कॉंग्रेस आणि खिलापतला बेकायदेशीर ठरविण्यात आले. असहकार चळवळीतील बऱ्याच नेत्यांना तुरूंगामध्ये डांबण्यात आले. यावर रजनीपाम दत्त म्हणतो, " जनता की नफरत का ऐसा व्यापक और सफल प्रदर्शन पहले कभी नहि हुआ था।"

**5) चौरी – चौरा कांड आणि आंदोलनाची समाप्ती (1922) :–**

असहकार आंदोलनाच्या काळात ब्रिटीश सरकारनी दडपशाही सुरू केल्यामुळे असहकार चळवळीचा कार्यक्रम तेजीत सुरू करावा अशी घोषणा म.गांधीनी केली. हयाशिवाय ब्रिटीशांच्या



Off. Principal
Late N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara

ISSN : 2348-7143
October-2019

विरोधात सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू करण्याचा निर्णय डिसेंबर 1921 मध्ये अहमदाबाद येथे भरलेल्या कॉंग्रेसच्या अधिवेशनात गांधीजींनी पास केला आणि गुजरातमधील बारडोली येथे सविनय कायदेभंग चळवळ सुरू केल्या जाईल असा निर्णय घेण्यात आला. ब्रिटीश सरकारने सात दिवसात दडपशाही कमी करावी अन्यथा इंग्रजांच्या विरोधात सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू केली जाईल अश्या प्रकारचा इशारा गांधीजींनी तत्कालीन ब्रिटीश व्हाईसरॉय लॉर्ड रिडींग हयांना दिला. परंतू सात दिवसाच्या आंतच असहकार चळवळ जोमात सुरू असतांना उत्तर प्रदेशातील गोरखपूर जिल्हयातील चौरी–चौरा या गावातील लोकांनी असहकार चळवळीच्या माध्यमातून एक मिरवणूक काढली. हया मिरवणूकीवर इंग्रज पोलीसांनी गोळीबार केल्यामुळे त्यात अनेक लोक ठार झाले. दारूगोळा संपल्यामुळे इंग्रज पोलीसांनी एका जवळच्याच इमारतीत आश्रय घेतला परंतू खवळलेल्या जमावाने त्या इमारतीला आग लावली आणि जे बाहेर पडले त्यांना दगडांनी ठेचून काढले, यामध्ये एकवीस इंग्रज पोलीस आणि एक पोलीस अधिकारी ठार मारल्या गेले यालाच 'चौरी–चौरा कांड' असे म्हणतात. ही बातमी संपुर्ण भारतात वाऱ्यासारखी पसरली. त्यामुळे गांधीजींनी आपली चळवळ अहिंसेवर आधारित होती आणि हया चळवळींनी हिंसक वळण घेतले त्यामुळे हि चळवळ स्थगीत करण्यात आली. यानंतर ब्रिटीश सरकारनी गांधीजींवर राजद्रोहाचा आरोप लावुन तुरूंगवासाची शिक्षा ठोठावण्यात आली अश्या प्रकारे असहकार आंदोलन समाप्त झाले. यावर कॉंग्रेस नेत्यांनी आपल्या प्रतिक्रीया व्यक्त केल्या. लाला लजपतराय म्हणतात, "किसी एक स्थानके पाप के कारण, सारे देश को दंड देना उचित नही है।" सुभाषचंद्र बोस म्हणतात,"राष्ट्रीय संघर्षोको ऐसे समय बंद करना अत्यंत दुखदायी था। जब की, जनता का जोश चरणसिमापर था।"

**महत्व / फलश्रृती :–**

असहकार चळवळ ही सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचली. याआधी ज्याकाही चळवळी झाल्या त्या फक्त बुध्दीजिवी वर्गापुरत्याच मर्यादीत होत्या. परंतू ही चळवळ खेडया–पाडयात आणि सर्व सामान्य जनतेपर्यंत पोहोचली. सर्वसामान्य जनतेनी देशाच्या स्वांतत्र्यासाठी प्रथमच हया चळवळीच्या माध्यमातुन भाग घेतला आणि त्यातुन भारतीय जनतेमध्ये जनजागृती होवुन राष्ट्रवादी भावना निर्माण झाल्या. यावर कुपलेंड इतिहासकार म्हणतो, "जे टिळकांना जमले नाही ते गांधीनी करून दाखविले. असहकार चळवळ अहिंसक, क्रांतीकारी बनविले." याआधी कॉंग्रेसचे कार्य हे प्रत्यक्ष कृतीपेक्षा वादविवादच जास्त होत परंतु हया चळवळींमुळे कॉंग्रेसला प्रत्यक्ष कृतीचे व्यासपीठ मिळाले. हया चळवळीनी भारतीय जनतेला इंग्रजांचा कसा प्रतिकार करायचा ते शिकविले. देशाला स्वातंत्र्य मिळवुन देण्यासाठी नेते आणि क्रांतीकारकच तुरूंगात जात होते. तुरूंगात जाण्यास सर्वसामान्य जनता घाबरत होती परंतु हया चळवळीमुळे जनतेच्या मनातील तुरूंगात जाण्याची भिती नष्ट झाली.

यापूर्वी अर्ज विनंत्या करून सरकारकडून आपल्या मागण्या मान्य करवुन घेत असत. परंतु आता हया मार्गाला मुठमाती देण्यात आली आणि प्रत्यक्षपणे राष्ट्रीय चळवळी सुरू झाल्या. पुढील काळामध्ये ज्या चळवळी सुरू झाल्या त्याची पार्श्वभुमी हया चळवळीतूनच मिळाली. यावर पंडीत नेहरू म्हणतात, "असहकार चळवळीमुळे भारतीयांमध्ये राष्ट्र चेतना आणि चैतन्य निर्माण झाले." हया चळवळीच्या माध्यमातुन देशी उद्योग धंदयांना चालना मिळाली. त्यामुळे भारतातील बंद पडलेली उद्योग–धंदे पुन्हा सुरू झाली. देशी शाळा, महाविद्यालये स्थापन झाली. हया चळवळीमध्ये नेते, सर्वसामान्य जनता, विद्यार्थी सहभागी झाले. कित्येकांनी सरकारनी दिलेल्या नौकऱ्या, पदव्या, मानसन्मान यांचा त्याग केला. म्हणजेच सरकारशी सहकार्य न करता आपली असहकाराची चळवळ सुरू केली.

Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani Dist. Bhandara


Website - www.researchjourney.net Email - researchjourney2014gmail.com